# परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय-2
# अनुशक्ती नगर, मुंबई
## घटक चाचणी-2023-24

**विषय:- मराठी (द्वितीय भाषा)** **गुण:- 40**

**इयत्ता:- आठवी** **वेळ:- 90 मिनिटे**

---

**प्रश्न:-1) खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(गुण-4)**

सत्पुरुष मनाला "बाबांनो, या गरीब बिचाऱ्या सशानं तुमचा कोणताही अपराध केलेला नाही हा आपल्या सवंगड्या बरोबर या रानावनात राहतो. गवत, पाला खातो. ओढ्याचं निर्मळ पाणी पितो आणि हसत बागडत असतो कोणालातरी त्याने त्रास दिला आहे का सांगा पाहू मग कशा करता याचा जीव घ्यायचा "

पारध्यांनी त्या सत्पुरुषाची क्षमा मागितली. यापुढे आपण प्राण्यांची हत्या करणार नाही अशी प्रतिज्ञा ही त्यांनी केली. पारधी निघून गेल्यावर त्या सत्पुरुषाने आपल्या मांडीखाली दडलेल्या सशाला वात्सल्याने कुरवाडले तेव्हा तो टुणकण उडी मारून जंगलात दिसण्याचा झाला.

**प्रश्न:-**

1) वरील उताऱ्यामध्ये कोणत्या प्राण्याचा उल्लेख केलेला आहे ?
2) सत्पुरुषाची क्षमा कोणी मागितली ?
3) पारध्यांनी कोणती प्रतिज्ञा केली ?
4) ससा काय खातो असे सत्पुरुष सांगतो ?

**प्रश्न:-3) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच).** **(गुण-5)**

1) कन्याकुमारीच्या त्या समुद्रामध्ये कोणते मासे होते ?
2) विद्येमुळे व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या दोन गोष्टी लिहा
3) अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या कोणत्या शहरात अनुवादित झाल्या ?
4) लाखाच्या कोटीच्या गप्पा या पाठातील संवाद कुठे घडला आहे ?
5) अण्णाभाऊ साठे यांचे राहण्याचे ठिकाण कोणते ?
6) कवीच्या जन्माला कुणामुळे अर्थ प्राप्त झाला ?

**प्रश्न:- 4) थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन.)** **(गुण-6)**

1) ग्रंथपालाने स्वामीजींच्या शिष्याजवळ त्यांच्या ग्रंथ वाचनाबद्दल व्यक्त केलेले मत लिहा.
2) अण्णाभाऊंच्या राहणीमानाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.
3) पाठाचा शेवट वाचण्यापूर्वी तरुण व म्हातारा यांविषयी तुमच्या मनात आलेले विचार लिहा.

**प्रश्न:- 5) कवितेच्या खालील ओळीतील भाव तुमच्या शब्दात लिहा. (कोणतेही एक)** **(गुण-2)**

1) नानाविध रत्नांची, कणकांची असती भूषणे फार,
   परि विद्यासम एकही शोभादायक नसे अलंकार

2) गुरुपरी उपदेश करी, संकट समयी  उपायही सूचवी
चिंतित फळ देऊनियां कल्पतरू परी मनोरथ पुरवी ||

**प्रश्न:- 6) कंसातील शब्दाचा वापर करून रिकाम्या जागा भरा.** **(गुण-5)**

(इंजिनमध्ये,काळी-सावळी, ललाटरेषा, समुद्रात, भूषणे )

1) जेव्हा स्वामी विवेकानंदांनी...............उडी मारली तेव्हा ते नावाडी घाबरून गेले.
2) ............. बिघाड झाल्यामुळे नागपूर-दादर एक्सप्रेस इगतपुरी स्टेशनवर तीन तास थांबून राहिली.
3) साडेचार फूट उंचीची माझ्यासारखीच........... मूर्ती घामेजलेल्या अंगानच बाहेर आली.
4) मी पाय धुळ घेतो जेव्हा तुझी जराशी, माझी........... बनते प्रयाग काशी.
5) नानाविध रत्नांची, कानाकांची असती ............. फार;

**प्रश्न:- 10) सूचनेनुसार लिहा.**

**अ:-) समानार्थी शब्द लिहा.(कोणतीही दोन)** **(गुण-2)**

1)कंठस्थ 2) कनक 3) भूषणे

**ब:-) विरुद्धार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन)** **(गुण-2)**

1)शिळे 2) अनुपस्थित 3) वेगाने

**क:-) वचन बदला. (कोणतीही दोन)** **(गुण-2)**

1) सामना 2) दागिने 3) कादंबरी

**ड:-) लिंग बदला. (कोणतेही दोन)** **(गुण-2)**

1)तरुण. 2) म्हातारी 3) सावळा

**इ:-) खालील वाक्याचे प्रकार ओळखा.( कोणतेही दोन)** **(गुण-2)**

1) "राजा, तुझं इंग्लंडला जाणं कधी पक्क झालं ?
2) अरेरे ! काय गलिच्छ वस्ती आहे.
3) आपण रोज सकाळी उठून अभ्यास करायला हवा.

**ई:-) खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.** **(गुण-3)**

1) ( ! )...................
2) ("   ") .....................
3) ( , ) ...................

**प्रश्न:-7तुमच्या भागात दूषित पाणीपुरवठा होत असल्यामुळे, पाणी पुरवठा अधिकाऱ्याला तक्रार करणारे पत्र लिहा .** **(गुण-5)**